**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक १६ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. **आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला दिलेल्या आर्थिक मदतीवर पुनर्विचार करावा असं संरक्षण मंत्र्यांचं आवाहन.**
2. **ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर, नागपुरात आयोजित तिरंगा यात्रेत हजारोंचा सहभाग.**
3. **केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंग चौहान परवा अर्थात 18 मे रोजी नागपूरात 'किसान संवाद' कार्यक्रम घेणार.**
4. **वर्धा, चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यात उद्या मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी.**

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधी**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीन पाकिस्तानला दिलेल्या आर्थिक मदतीचा फेरविचार करावा असं आवाहन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केलं. ते आज गुजरातमधल्या भुज इथल्या वायुसेना तळावर जवानांना संबोधित करत होते. नाणेनिधीन दिलेल्या मदतीचा मोठा भाग दहशतवादी कारवायांवर खर्च होण्याची शक्यता असल्याचं त्यांनी सांगितलं. ऑपरेशन सिंदूर मधल्या वायुसेनेच्या कामगिरीची त्यांनी प्रशंसा केली. तसंच या प्रतिहल्ल्याचं देशभरात आणि जागतिक स्तरावर कौतुक होत आहे, असं ते म्हणाले. पाकिस्तानशी केलेली शस्त्रसंधी म्हणजे लष्करी कारवाईचा पूर्णविराम नसून केवळ अल्पविराम आहे, वारंवार गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारावर जसं पोलीस लक्ष ठेवून असतात त्याचप्रमाण आम्ही पाकिस्तानवर लक्ष ठेवून आहोत आणि पाकिस्तानन पुन्हा काही आगळीक केल्यास त्याला आपलं सैन्यदल धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही असा इशारा संरक्षण मंत्र्यांनी यावेळी दिला. राजनाथ सिंह आज भारत-पाकिस्तान सीमा प्रदेशालाही भेट देणार आहेत. यावेळी ते भारतीय लष्कराच्या तयारीचं परीक्षण करतील. भारत-पाकिस्तान तणावाच्या वेळी पाकिस्तानं भुज वर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे संरक्षण मंत्र्यांची ही भेट महत्त्वाची मानली जात आहे.

**आर्थिक सहकार्य**

पाकिस्तानन दहशतवादी गटांशी थेट संबंध ठेवून त्यांना आर्थिक सहकार्य केल्याचं पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मुहम्मद आसिफ यांनी एका ब्रिटिश वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत कबूल केलं आहे. पहलगाम मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ही कबुली देण्यात आल्यामुळ प्रादेशिक अस्थिरतेत पाकिस्तानच्या सहभागाबद्दल चिंता व्यक्त होत आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा

परिषदेनं लष्कर-ए-तैयबासारख्या दहशतवादी गटांशी पाकिस्तानच्या संबंधांची तपासणी केली आहे. जागतिक पातळीवर पाकिस्तानचं दहशतवादाला खतपाणी घालण्याचं धोरण उघडकीस आणण्यासाठी भारतानं सतत प्रयत्न केले आहेत. हाफिज सईद आणि झाकी-उर रहमान लखवीसह अनेक दहशतवादी पाकिस्तानात आश्रयास असून या व्यक्ती तसंच लष्कर-ए-तैयबा आणि जमात-उद-दावासारख्या संघटना संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या निर्बंध यादीत समाविष्ट झाल्या आहेत. त्यामुळ आंतरराष्ट्रीय समुदायानं या मुद्द्याला मान्यता दिली आहे. हे अधोरेखित झालं आहे.

**तिरंगा यात्रा**

भारतीय सैन्यान ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून दाखवलेल्या शौर्याचा गौरव करण्यासाठी तसच भारतातील 140 कोटी लोक आणि महाराष्ट्रातील 14 कोटी लोक हे भारतीय सैन्याच्या पाठीशी आहे. हे दाखवण्याकरिताच तिरंगा यात्रेच आयोजन पूर्ण राज्यभर करण्यात आल्याच नागपूरचे पालकमंत्री आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केलं. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय संरक्षण दलाच्या गौरवपूर्ण कामगिरीच्या सन्मानार्थ, नागपूर जिल्ह्यातील कामठी शहर इथल्या, जयस्तंभ चौक-मोटर स्टॅन्ड ते नेताजी चौकापर्यंत, तिरंगा यात्रा, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत काढण्यात आली.या यात्रेत सहभागी झाल्यानंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते..........

***या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर लोक सहभागी झाले आहेत. सर्व समाजाचे सर्व धर्माचे लोक या ठिकाणी तिरंगा रैली मध्ये आहे. महाराष्ट्रातील हजाराच्या वरती तिरंगा रैलीच आयोजन झाल आहे आणि काल मुंबईमध्ये माननीय देवेंद्र फडणवीसजी यांनी तिरंगा रैली केली, यात्रा केली, सोबत सिंदूर यात्राही आमच्या महिला बहिणी महाराष्ट्रात काढतात आहे.***

याप्रसंगी बावनकुळे यांनी मुख्य चौकातील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला मानवंदना करत, या यात्रेचा प्रारंभ केला. यात्रेमध्ये मोठ्या प्रमाणात माजी सेवानिवृत्त सैनिक तसंच नागरिकांनी सहभाग घेतला. यात्रेचा समारोप मोटर स्टॅन्ड ते नेताजी चौकात, मंत्री बावनकुळे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

**विकासदर**

भारत ही जगातली जलदगतीनं वाढणारी मोठी अर्थव्यवस्था असून चालू आर्थिक वर्षात देशाचा विकासदर सहा पूर्णांक तीन दशांश टक्के राहण्याचा अंदाज संयुक्त राष्ट्रांच्या ताज्या अहवालात वर्तवला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक आर्थिक स्थिती आणि शक्यता या विषयी तयार करण्यात आलेल्या मध्यवर्ती अहवालामध्ये हे निरीक्षण नोंदवण्यात आलं आहे. जागतिक अर्थव्यवस्था सध्या अस्थिर परिस्थितीचा

सामना करत आहे.त्यामुळ यामध्ये काहीसा फरक होऊ शकतो, असंही त्यामध्ये नमूद करण्यात आलं आहे. यामध्ये अपेक्षित असलेली वाढ ही खासगी खरेदीदारी आणि सार्वजनिक गुंतवणुकीद्वारे होण्याची शक्यता आहे, असं संयुक्त राष्ट्रांच्या वरिष्ठ अर्थतज्ञ इन्गो पिटरले यांनी सांगितलं.भारताचा विकासदर पुढील वर्षी थोडा वाढून ६ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.

**केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंग चौहान**

केंद्रीय कृषिमंत्री आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंग चौहान येत्या 18 मे रविवार रोजी नागपूरच्या सुरेश भट सभागृहामध्ये दुपारी 12 ते 2 या कालावधीमध्ये सुमारे 1 हजार 500 हून अधिक शेतकऱ्यांशी किसान संवाद या कार्यक्रमात संवाद साधणार आहेत . याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रामुख्यान उपस्थित राहणार असल्याची माहिती राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण आणि जमीन व्यवस्थापन संस्था एनबीएसएसएलयुपी (NBSSLUP) नागपूरचे संचालक डॉ.एन.जी.पाटील यांनी आज दिली. 18 मे रोजी दुपारी 3 ते 4 दरम्यान अमरावती रोड स्थित एनबीएसएसएलयूपी (NBSSLUP) इथं महाराष्ट्रात राबविण्यात येत असलेले कृषी आणि ग्रामीण विकास कार्यक्रमाबद्दलचा आढावा देखील कृषिमंत्री शिवराज सिंग चौहान भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या अधिकाऱ्यांसोबत घेतील. याप्रसंगी एनबीएसएसएलयूपीने (NBSSLUP) न हायपर स्प्रेक्टल सेंसर चा वापर करून देशातील विविध विभागांची मातीची पीएच घनता तसच मूलद्रव्यांची स्पेक्टो-रेडिओ-मिटर द्वारे माहिती संकलन होत असून या माहितीच्या 'नॅशनल सॉईल स्पेक्ट्रम स्पेक्ट्रल लायब्ररीच' देखील उद्घाटन शिवराज सिंग चौहान यांच्या हस्ते होणार असून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहृयान कापसावर पडणाऱ्या बोंड अळी कीटक व्यवस्थापन या तंत्रज्ञानाच सुद्धा उद्घाटन याप्रसंगी होणार आहे . 'विकसित कृषी संकल्प अभियानाअंतर्गत वैज्ञानिकांद्वारे शेतकऱ्यांना खरीप पूर्व शेतीच मार्गदर्शन तसच त्यांचा प्रतिसाद देखील संकलित करण्याचा प्रारंभ या कार्यक्रमादरम्यान केला जाणार आहे.

**हवामान**

पूर्व विदर्भातील वर्धा आणि चंद्रपूर तर पश्चिम विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात उद्या, मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा आणि हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. उर्वरित विदर्भात उद्या येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान आज देखील विदर्भातील भंडारा आणि गोंदिया हे जिल्हे वगळता विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट आहे. आगामी काही तासांत बहुतांश विदर्भातल्या जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे. दरम्यान, विदर्भात आज सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं ४१ अंश सेल्सियस इतकं नोंदवण्यात आलं तर नागपुरात ३७ पूर्णांक ५ अंश

सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. नागपुरात सकाळपासून ढगाळ वातावरण असून त्यामुळे उकाड्यात वाढ झाली आहे.

**खेलो इंडिया**

जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आपण सर्वांनी महाराष्ट्राच्या क्रीडा गौरवात आणखी भरच घातली आहे. या यशामुळ आपण सर्व खेळाडू महाराष्ट्राचा अभिमान आहात,' अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खेलो इंडिया युवा स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपदाची हॅट्ट्रिकचा पराक्रम साधणाऱ्या महाराष्ट्राच्या चमुतील खेळाडुंच अभिनंदन केल आहे. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सर्वोत्तम कामगिरी करत ५८ सुवर्ण, ४७ रौप्य, ५३ कांस्य अशी एकूण १५८ पदकांची लयलूट केली आहे.

**खरीप हंगाम**

आगामी खरीप हंगामाला आत्मविश्वासान सामोर जातांना शेतकरी बंधू -भगिनींना अत्यावश्यक माहितीसह विद्यापीठ संशोधित बी-बियाणे तथा इतर कृषि निविष्ठा वेळेत उपलब्ध व्हाव्यात या हेतून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठा तर्फे सोमवार 19 मे सकाळी 10:00 वाजता "खरीपपूर्व कृषी मेळावा" आयोजित केला आहे. कृषी महाविद्यालय, अकोलाच्या के.आर.ठाकरे सभागृहात आयोजित या मेळाव्यामध्ये येत्या खरीप हंगामातील संभाव्य पाऊसमान, विविध पिकांच्या जाती, नवीन संशोधित पीक पद्धती, आंतरपीक पद्धती, मृदा आणि जलसंधारण व्यवस्थापन, एकीकृत कीड आणि रोग व्यवस्थापन, सुधारित यंत्र आणि अवजारे इत्यादी बाबत शेतकरी बंधूंना विविध विषय तज्ज्ञांमार्फत सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

******